**कृपया प्रसिध्दीसाठी** **29 डिसेंबर 2008**

## पाकिस्तान हे दहशतवादी राष्ट्र घोषित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दबाव निर्माण करा - राजनाथ सिंह

**मुंबई, सोमवार :** " पाकिस्तान हे दहशतवादी राष्ट्र घोषित करा व आय्. एस्. आय्. ही अतिरेकी संघटना घोषित करा. पाकिस्तानातील दहशतवाद्यांना प्रशिक्षण देणारी केंद्रे आपण नष्ट करु शकतो, असा आंतरराष्ट्रीय पातळीवर विश्वास निर्माण करा " अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. राजनाथ सिंह यांनी येथे केली. गोरेगाव पश्चिम येथे व्हिनस कल्चरल क्लब तर्फे आयोजित ‘शहिद स्मृती क्रीडांगणा’ च्या लोकार्पण समारंभात ते बोलत होते. माजी उपमहापौर व नगरसेविका श्रीमती विद्या ठाकुर व व्हिनस कल्चरल असोसिएशन यांच्या संयुक्त प्रयत्नांनी तयार झालेल्या या विस्तिर्ण क्रीडांगणात 26 नोव्हेंबर च्या हल्ल्यात शहीद झालेल्यांची नावे असलेला स्मृती स्तंभ आहे.

"देशावर आलेल्या संकटाच्या वेळी देशहिताच्या दृष्टीने योग्य निर्णय असेल, तर सरकारला भाजपा संपूर्ण सहकार्य देईल. परंतु हेमंत करकरेंच्या वीर-मरणावर प्रश्नचिन्ह लावण्याचे केंद्र सरकारच्या एका मंत्र्याचे वक्तव्य आम्ही सहन करु शकत नाही," असे सांगून राजकारणाचा उपयोग सरकार बनविण्यासाठी नव्हे, तर समाज घडविण्यासाठी केला पाहिजे, असे प्रतिपादन श्री. राजनाथ सिंह यांनी केले.

या समारंभात प्रमुख अतिथि या नात्याने बोलताना माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक म्हणाले, "संसदेवर हल्ला करणा-या अफझल गुरुला फाशी न देऊन अतिरेक्यांची हिंमत वाढविण्याचे काम या काँग्रेस सरकारने केले आहे, त्यामुळेच त्यांनी मुंबईवर हल्ला करण्याचे धाडस केले आहे. आता अफझल गुरुला लवकरात लवकर फाशी दिली गेलीच पाहिजे," असे सांगून श्री. नाईक यांनी "कसाबला हुतात्मा चौकात जाहिरपणे फाशी दिली पाहिजे" अशी मागणी केली.

भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस श्री. गोपीनाथ मुंडे यांनी यावेळी बोलताना हिंदुस्तानने चार युध्दे अंगावर झेलली आहेत, आता यापुढे हा देश हल्ले सहन करणार नाही, असा ईशारा देऊन पाकिस्तानमधील सर्व प्रशिक्षण केंद्रे उध्वस्त करणे, हीच या शहिदांना खरी श्रध्दांजली होय असे सांगितले. माजी केंद्रिय मंत्री श्रीमती जयवंतीबेन मेहता, आमदार व मुंबई भाजपा अध्यक्ष श्री. गोपाळ शेट्टी, आमदार व शिवसेना नेते श्री. सुभाष देसाई, आमदार श्री. गजानन कीर्तिकर, यांचीही यावेळी भाषणे झाली.

या समारंभात शहिद पोलीस अधिकारी विजय साळसकर यांच्या पत्नी श्रीमती स्मिता साळसकर व त्यांची मुलगी दिव्या या उपस्थित होत्या. या वेळी बोलताना कु. दिव्या साळसकर यांनी वडिलांचे हे बलिदान व्यर्थ जाऊ नये, अशी इच्छा व्यक्त केली. "या मैदानात शहिदांच्या प्रेरणादायी आठवणी चिरंतर रहाव्यात यासाठी उभारलेल्या स्मृतिस्तंभ तसेच बालोद्यान, वरिष्ठ नागरिकांसाठी विश्राम व योगासनांची सोय, जॉगर्स पार्क आदी सोयी आहेत. येथे जॉगिंग करण्यासाठी येणा-या लोकांनी यातून प्रेरणा घेऊन अनेक करकरे, साळसकर निर्माण व्हावेत," अशी भावना यावेळी बोलताना मुंबई भाजपाचे उपाध्यक्ष व व्हिनस कल्चरल क्लबचे विश्वस्त श्री. जयप्रकाश ठाकूर यांनी आपल्या प्रास्ताविकात व्यक्त केली. सामुहिक राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सांगता झाली.

**(कार्यालय सचिव)**